**असुधारित प्रत**

# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## मंगळवार, दिनांक १० मार्च, २०१५

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय.**

**दोन : प्रश्नोत्तरे.**

**तीन : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**चार : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव.**

**पाच : सभापती, सभापती-तालिका नामनिर्देशित करतील.**

**सहा : अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**(क) मुख्यमंत्री** : **(१)** "सन २०१४ चा अध्यादेश क्रमांक १८ - "महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१४" सभागृहासमोर ठेवतील.

: **(२)** "सन २०१५ चा अध्यादेश क्रमांक २ - "महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अध्यादेश, २०१५" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख) महसूल मंत्री** : "सन २०१५ चा अध्यादेश क्रमांक ३ - "नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजुर अपचलनगर साहिब (सुधारणा) अध्यादेश, २०१५" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग) वित्त मंत्री** : "सन २०१५ चा अध्यादेश क्रमांक १ - महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २०१५" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : "सन २०१५ चा अध्यादेश क्रमांक ४ - "महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१५" सभागृहासमोर ठेवतील.

**सात : सन २०१४-२०१५ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.**

**आठ : दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपतींची/राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करण्यात येईल.**

**असुधारित प्रत**

**नऊ : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना - असल्यास.**

**दहा : लक्षवेधी सूचना - (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -**

(१) **ॲड. अनिल परब वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"शाळा-महाविद्यालय, न्यायालय, रुग्णालय, मैदान यांच्या शंभर मीटरपर्यंतच्या परिसरात शांतता क्षेत्र जाहिर करण्यात येऊनही संबंधित विभागाकडून त्याची अंमलबजावणी होत नसल्याने नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास येणे, वाहनांची गर्दी, फटाके, बेंजो, मंदिर-मशिदीतील प्रार्थना, कारखाने, यामुळे शहरातील लोकसंख्येमुळे होत असलेल्या गोंगाटात अधिकच भर पडून त्यांच्या आवाजामुळे येत असलेले तात्पुरते बहिरेपण, अस्वस्थता, तणाव तसेच सतत डोकेदुखी उच्च रक्तदाब, हृदयाचे असंबध्द ठोके, मानसिक अनारोग्य असे दुष्परिणामही आवाजामुळे होत असल्याने शहरातील ध्वनीची पातळी मोजून ती कमी करण्यासाठी उपाय सुचवणारी सल्लागार समिती नेमण्यास मिळालेली मंजूरी, तब्बल १२०० ठिकाणी ध्वनीची नियमित नोंद केली जात असतांनाही याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(२) **सर्वश्री. संजय दत्त,** अशोक ऊर्फ भाई जगताप, शरद रणपिसे, प्रा. जोगेंद्र कवाडे, सर्वश्री. धनंजय मुंडे, दिपकराव साळुंखे-पाटील, अमरसिंह पंडित, सुनिल तटकरे, जयवंतराव जाधव, किरण पावसकर, प्रकाश बिनसाळे, ॲड.निरंजन डावखरे, श्री. नरेंद्र पाटील, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री. आनंद ठाकूर, सतीश चव्हाण, अनिल भोसले, डॉ. अपूर्व हिरे, श्री. जगन्नाथ शिंदे, हेमंत टकले, ख्वाजा बेग, विक्रम काळे, ॲड. राहूल नार्वेकर **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीचे अध्वर्य डॉ.नरेंद्र दाभोळकर यांची हत्या होवून एक वर्ष उलटले, नाहीतर पुरोगामी महाराष्ट्रात दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ रोजी कोल्हापूरचे कष्टकारी वर्गाचे नेते, डाव्या चळवळीचे पितामह कॉ.गोविंदराव पानसरे आणि त्यांच्या पत्नीवर अज्ञात हल्लेखोऱ्यांनी घराजवळच गोळया घालून हल्ला करण्यात येणे, त्यात पानसरे व त्यांच्या पत्नी उमा दोघे जबर जखमी होणे, दिनांक २० फेब्रुवारी, २०१५ रोजी मुंबईतील ब्रिच कॅन्डी हॉस्पिटलमध्ये उपचाराच्या दरम्यान कॉ.गोविंदराव पानसरे यांचे निधन होणे, सदर घटनेतील आरोपी अद्याप अटक न करण्यात येणे, दाभोळकरांचे

मारेकारी, कॉ.पानसरे यांचे मारेकारी इत्यादी प्रकरणांचा छडा लागत नसून या प्रकरणातील आरोपींना अटक न झाल्याने बेभाटपणे आरोपी फिरत असल्याने या पुरोगामी विचारांच्या आरोपींना अटक करण्यात राज्यशासनाला आलेले अपयश, राज्यातील विविध भागातून सदर घटनेच्या विरोधात तीव्र प्रतिसाद उमटने, त्यामुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा निर्माण झालेला प्रश्न, राज्यात वाढीस लागले गुन्हे हा चिंतेचा प्रश्न बनणे, राज्य शासनाने सदर घटनेतील आरोपींना लवकरात लवकर अटक करुन राज्यात वाढत चाललेल्या गुन्ह्यांना आळा बसण्यासाठी करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. सुनिल तटकरे,** किरण पावसकर, प्रकाश बिनसाळे, हेमंत टकले, नरेंद्र पाटील, ॲड. निरंजन डावखरे श्रीमती विद्या चव्हाण, श्री.धंनजय मुंडे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ऊर्जा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"नैसर्गिक वायु अभावी बंद पडलेल्या दाभोळ (जि.रत्नागिरी) येथील रत्नागिरी गॅस अँड पॉवर प्रा.लि. ची महावितरणकडे असलेली दोन हजार कोटीची थकबाकी सदर वीज प्रकल्पास रिलायन्स कडून होणारा वायुचा पुरवठा बंद होणे, परिणामी अडीच वर्षापूर्वी १६०० मेगावॅट वीज निर्मिती करणारा वीज प्रकल्प सुमारे दीड वर्षापासून बंद असणे, वीज मिळत नसल्याने महावितरणकडून मिळणारा महसूल बंद होणे, एक युनिट वीज मिळत नसल्याने स्थिर आकाराची रक्कम देण्यासही महवितरणने दिलेला नकार, प्रकल्पासाठी सुमारे १० हजार कोटीचे कर्ज देणाऱ्या बँका आर्थिक अडचणीत सापडणे, तथापि, दाभोळ येथील नैसर्गिक वायू टर्मिनलवर डोळा ठेवून रत्नागिरी गॅस अँड पॉवर प्रा.लि. प्रकल्प एका खाजगी मोठ्या कंपनीने चालविण्यास दाखविलेली अनुकुलता याकरिता केंद्र शासनाने कायद्यात केलेले प्रस्तावित बदल, याप्रकरणी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री. पांडुरंग फुंडकर वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"खामगांव जि.बुलढाणा येथील सामान्य रुग्णालयात पुरेशा आणि अत्यावश्यक वैद्यकीय सुविधा व तज्ञ डॉक्टरांच्या अभावामुळे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची प्रचंड गैरसोय होत असल्याची उघडकीस आलेली घटना, खामगांव येथील सामान्य रुग्णालय हे बुलढाणा जिल्ह्यातील दुसऱ्या क्रमांकाचे आकाराने आणि नावाने मोठे रुग्णालय असल्यामुळे येथे दररोज शेकडो रुग्णांची उपचार घेण्यासाठी गर्दी असणे, हे रुग्णालय

महामार्गावार असल्यामुळे या ठिकाणी मोठया प्रमाणावर नित्याने होणाऱ्या अपघातातील जखमींना उपचारासाठी दाखल करण्यात येणे, पंरतू या रुग्णालयात अत्यावश्यक वैद्याकिय सुविधा व तज्ञ डॉक्टर नसल्याने अपघातातील जखमींवर प्रथमोपचार करुन पुढील उपचारासाठी अकोला येथे पाठविण्यात येते, या रुग्णालयात अनेक वर्षांपासून सिटीस्कॅन, सोनोग्राफी यासह इतरही मेजर शस्त्रक्रिया उपकरणांची उपलब्धता नसल्याने व तज्ञ डॉक्टरांची काही पदे रिक्त असल्याने मोठया प्रमाणात रुग्णसेवा प्रभावित होणे, नांदूरा, मलकापूर, जळगाव जामोद या ठिकाणाहून रुग्णांना चांगल्या आणि अत्यावश्यक उपचारासाठी खामगांव सामान्य रुग्णालयात पाठविण्यात येते, परंतू येथे प्रथमोपचाराशिवाय कोणताही मोठा ईलाज होत नसल्याने नातेवाईकांना हेलपाटे घेत रुग्णांना घेवून अकोला येथे जावे लागत असल्यामुळे अनेक वेळा गंभीर स्वरुपाच्या रुग्णांना प्राणास मुकावे लागणे, या रुग्णालयातील ३ पैकी २ स्त्रीरोग तज्ञ डॉक्टरांच्या जागा रिक्त असल्यामुळे तपासणीसाठी येणाऱ्या गर्भवती महिलांना हेलपाटे घेत, खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागणे, खामगांव सामान्य रुग्णालयाला उप जिल्हा रुग्णालयाचा दर्जा असूनही हा दवाखाना एखाद्या प्राथमिक आरोग्य केंद्रासारखा ठरला असून रुग्णांची गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने सर्व सोईंनी युक्त असा दवाखाना निर्माण करण्यासाठी तज्ञ डॉक्टरांची तात्काळ भरती करण्याबाबत व कंत्राटी पध्दतीने डॉक्टरांची पदे भरण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबतची शासनाची भूमिका."

**अकरा : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

# - मध्यंतर -

**बारा : सर्वश्री.अमरसिंह पंडित,** सतिश चव्हाण, अनिल भोसले, जयवंतराव जाधव, प्रकाश बिनसाळे, ॲड. राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. प्रकाश गजभिये, हेमंत टकले, दिपकराव साळुंखे, राजेंद्र जैन, संदिप बाजोरिया, ख्वाजा बेग, किरण पावसकर, जगन्नाथ शिंदे, नरेंद्र पाटील, आनंद ठाकूर, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री. रामराव वडकूते, प्रभाकर घार्गे, **वि.प.स.** यांनी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १८३ व म.वि.प.नियम ११ अन्वये दिलेला पुढील प्रस्ताव मांडण्यास परवानगी देणे -

**"महाराष्ट्र विधानपरिषदेचे मा.सभापती यांनी सभागृहाचा विश्वास गमावला असल्याने त्यांना सभापती पदावरुन दूर करण्यात यावे."**

**असुधारित प्रत**

**तेरा : वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

**चौदा : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये- (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्री., वि.प.स.**

**(२) श्री, वि.प.स.**

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ९ मार्च, २०१५.

**उत्तमसिंग चव्हाण,**
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.